# मिरा भाईंदर महानगरपालिका

**मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. महासभा दि. २५/०१/२०२२ रोजी आयोजित केली आहे. सदर सभेकरीता मा. सदस्यांचे खालीलप्रमाणे प्रश्न आलेले आहेत.**

| **३७. श्री. अजित भ. पाटील मा. सदस्य यांनी दि. २९/१०/२०२१ रोजी विचारलेला प्रश्न.** | |
|---|---|
| १) म.न.पा. ने शहरातील उद्याने, मैदाने, स्मशानभूमी व दुभाजके निगा व देखभालीसाठी ठेकेदार नेमले आहे त्या कामापैकी नेताजी सुभाषचंद्र बोस मैदान व प्रभाग समिती क्र.3 मधील आरक्षण क्र. 122क मैदान (सचिन तेंडूलकर मैदान) ह्यामधील अनावश्यक गवत काढणे, मैदानातील गवत कटींग करणे, फक्त ह्या कामापोटी एप्रिल 21 ते सप्टेंबर 21 ह्या कालावधीतील कामासाठी अनुक्रमे रु. 83,29,499/- व रु. 51,56,432/- इतकी रकमेची देयके अदा केलेली आहेत अशी शहरामध्ये चर्चा आहे हे खरे आहे काय? | हे खरे नाही. सदर बाबतचा वस्तुस्थिती अहवाल खालील प्रमाणे<br>मिरा भाईंदर महानगरपलिका क्षेत्रातील उद्याने, मैदाने, स्मशाने व दुभाजके यांची निगा व देखभाल २ वर्ष कालावधीकरीता करणेकामी महाराष्ट्र शासन निर्णय क्र. मिभाम-११२० /प्र.क्र. /४६ /नवि-२८ दि.०२/०३/२०२१ अन्वये मा. स्थायी समिती प्रकरण क्र. ३० दि.१७/०८/२०२० मधिल गोषवाऱ्यानुसार मे. निसर्ग लॅण्डस्केप सर्व्हिसेस यांची कमी दराची निविदा मंजुर केली आहे. त्यानुसार मा. आयुक्त सो. यांच्या दि.३१/०३/२०२१ रोजीच्या मंजुरीने करारनामा करुन कार्यादेश देण्यात आला आहे. त्यानुसार माहे एप्रिल २०२१ ते सप्टेंबर २०२१ ह्या कालावधीत नेताजी सुभाषचंद्र बोस मैदानाकरीता रु.७८,१९.६५९/- व प्रभाग समिती क्र. ३ मधील आरक्षण क्र. १२२क मैदानाकरीता (सचिन तेंडुलकर मैदान) रु.३६,८०,३०६/- इतकी रकमेची देयके अदा केलेली आहेत<br>तसेच दि.१२/०४/२०२१ रोजी केलेल्या करारनाम्यातील अट क्र. २१ नुसार मिरा भाईंदर महानगरपलिका क्षेत्रातील उद्याने, मैदाने, स्मशाने व दुभाजके इत्यादी ठिकाणच्या मोजमापबद्दल काही तक्रारी आल्यास दोन्ही पक्षकाराच्या समोर (महानगरपालिका व ठेकेदार) पुनश:च सदर ठिकाणची मोजमाप घेण्यात येईल. केलेल्या मोजमापाप्रमाणे देयक कमी जास्त झाल्यास त्यानुसार संबधित पक्षकाराकडुन वसुल करण्यात येईल असे नमुद आहे.<br>नेताजी सुभाषचंद्र बोस मैदानाचे एकुण क्षेत्रफळ ६५००० चौ.मी.(म्हणजेच १६ एकर) असुन सदर मैदानावर देनंदिन १५ ते २० मजुर व अत्याधुनिक मशीनरी मार्फत निगा व देखभालचे काम करण्यात येत आहे.<br>प्रभाग समिती क्र. ३ मधील आरक्षण क्र. १२२क मैदान (भारतरत्न सचिन तेंडुलकर मैदान) येथील जा.क्र.मनपा/साबां/१३०६/२०१९-२० दि.२०/१२/२०१९ अनव्ये मे. राणे कन्सलटंट यांना मोजमाप करणेबाबत बांधकाम विभागाने कार्यादेश दिला होता(सोबत मा. कार्यकारी अभियंता यांचे पत्र जोडलेले आहे). त्यामध्ये आरक्षण क्र. १२२क मैदान (भारतरत्न सचिन तेंडुलकर मैदान) चे मोजमाप ४१,७४९ चो.मी. क्षेत्रफळ असे देण्यात आलेले होते(सोबत नकाशा जोडलेला आहे). तथापि, सदर मैदानाची पाहणी केली असता सदरचे मोजमाप जास्त असल्याचे निदर्शनास आलेले आहे. त्याप्रमाणे माहे ऑगस्ट२१ पासुन सदर मैदानाचे क्षेत्रफळ कमी करुन केलेल्या कामाप्रमाणे देयक अदा करण्यात येत आहे(सोबत तक्ता जोडलेला आहे). तसेच यापुर्वी माहे एप्रिल-२१ ते जुले-२१ पर्यंतचे आरक्षण क्र. १२२क मैदान (भारतरत्न सचिन तेंडुलकर मैदान) चे जास्तीचे देयक रु.२५,२३,८७७/- माहे ऑक्टोंबर२१ च्या देयकातुन कपात करण्यात आलेले आहे(सोबत तक्ता जोडलेला आहे). |
| अ) असल्यास, वस्तुस्थितीची माहिती होणे आवश्यक आहे. त्यानुसार प्रत्येक मैदानातील एस्टीमेटमधील स्पेसिफिकेशननुसार प्रत्येक ॲटमवार झालेले काम, अदा केलेली रक्कम, महिनानिहाय तपशिलवार माहिती देण्यात यावी. | नाही. |
| ब) MAC 1971 नियम 180 प्रमाणे ठेक्याच्या झालेल्या कामाची बाबनिहाय नोंदी मोजणी पुस्तकामध्ये (MAC 1971 नियम 136) | उपरोक्त नमुद प्रमाणे निगा व देखभालीच्या कामाची तांत्रिक तपासणी कनिष्ठ अभियंता, प्र. उप-मुख्य उद्यान अधिक्षक व उप-आयुक्त(उद्यान) यांचेमार्फत वेळोवेळी करत असतात मोजमापानुसारच रजिस्टर / मोजमाप पुस्तिके(MB) मधील नोंदी तपासुन मुख्य |

| | |
|---|---|
| घेण्याची तरतुद आहे. मोजणी पुस्तकातील नोंदी त्यातील दर (मुळ एस्टीमेट दराप्रमाणे आहेत किंवा नाही) तपासूनच देयके अदा करण्याची तरतुद आहे. मोजणी पुस्तकातील नोंदी तपासून देयके अदा केली आहेत किंवा कसे? मोजणी पुस्तकातील नोंदी कोणी तपासल्या आहेत? | लेखाधिकारी व मुख्य लेखापरीक्षक यांच्या तपासणी नंतरच मा. अतिरीक्त आयुक्त व मा. आयुक्त यांच्या मान्यतेने देयक अदा करणेत येते. |
| ३८. श्री. अजित भ. पाटील मा. सदस्य यांनी दि. २९/१२/२०२१ रोजी विचारलेला प्रश्न. | |
| १) शहरातील उद्याने, मैदाने, स्मशाने निगा व देखभाल कामाच्या एस्टीमेट रु. 26.58 कोटीला MAC 1971 नियम 160 प्रमाणे महासभेची प्रशासकीय / आर्थिक मंजूरी आहे का? | मा. महासभा ठराव क्र. २५ दि. ०७/०६/२०१९ अन्वये उद्याने, मैदाने, दुभाजक इत्यादी ठिकाणची निगा व देखभाल करणे कामाचे सर्व प्रशासकीय कार्यवाहीचे अधिकार मा.आयुक्त सो. यांना देण्यात आलेले आहेत. त्यानुसार सदरकामी E-Tendering Online पध्दतीने निविदा मागविण्यात आलेली होती. तसेच मा. स्थायी समिती प्रकरण क्र. ३० दि.१७/०८/२०२० मधील गोषवाऱ्यानुसार सदर कामाच्या निविदेस नगरविकास विभाग, शासन निर्णय क्र. :- मिभाम-११२०/ प्र.क्र.४६/नवि-२८ दि.०२/०३/२०२१ अन्वये मंजुरी दिलेली आहे. तसेच सदर शासन निर्णय मा. उच्च न्यायालयामध्ये रिट याचिका क्र. ९९८५७/२०२० मध्ये निदर्शनास आणुन दिल्यावर सदरची याचीका निरर्थक ठरल्यामुळे मा. उच्च न्यायालयाने सदरची याचिका निकाली काढली आहे.<br>तरी मा. उच्च न्यायालयाचा निर्णय व दि.०२/०३/२०२१ रोजीचा शासन निर्णयाचा मंजुरी अन्वये शहरातील उद्याने, मैदाने, स्मशाने यांची निगा देखभालीची कामे करण्यात येत आहेत. |
| अ) असल्यास, ठराव मंजूरी क्रमांक, तारीख प्रमाणित करावी. | लागु होत नाही. |
| ब) एस्टीमेटला MAC 1971 नियम 161 नुसार तांत्रिक मंजूरी आहे काय? मंजूरी आदेश प्रत द्यावी. | एस्टीमेटला उद्यान अधिक्षक व मा. उप. आयुक्त (उद्यान) यांनी मंजुरी दिलेली आहे. |
| क) एस्टीमेटमधील दर MAC 1971 नियम 166 नुसार (लागु केलेल्या दरसुचीप्रमाणे) नुसार जादा आहेत हे खरे आहे काय? | नाही. |
| ड) असल्यास, अशाप्रकारे जादा दराने (दरसुचीपेक्षा) एस्टीमेट तयार करणे MAC 1971 नियम 166 चे उल्लंघन करणारे आहे हे खरे आहे काय? | लागु होत नाही. |
| ३) एस्टीमेटला तांत्रिक मंजूरी नसल्याने सदर एस्टीमेट अवैध ठरत आहे त्यामुळे ठरलेल्या एस्टीमेट दराप्रमाणे देयक अदा करणे नियमबाह्य आहे हे खरे आहे काय? | महाराष्ट्र शासनाच्या Government of Maharashtra Public works Department, Park and Gardens Mumbai २०१५-१६ या DSR दराप्रमाणे एस्टीमेट तयार करण्यात आलेली असुन उद्यान अधिक्षक व मा. उप. आयुक्त (उद्यान) यांची मंजुरी घेण्यात आलेली आहे.<br>मा. उच्च न्यायालयाचा निर्णय व दि.०२/०३/२०२१ रोजीचा शासन निर्णयाच्या मंजुरी अन्वये शहरातील उद्याने, मैदाने, स्मशाने यांची निगा देखभालीची कामे करण्यात येत आहेत. त्यामुळे वैध एस्टीमेट दराप्रमाणे देयके अदा करण्यात येतात. |
| ३९. श्री. अजित भ. पाटील मा. सदस्य यांनी दि. २९/१२/२०२१ रोजी विचारलेला प्रश्न. | |
| १) शहरातील उद्याने, मैदाने, स्मशाने निगा व देखभालसाठी दिलेल्या | हे खरे नाही. सदर बाबतचा वस्तुस्थिती अहवाल |

| | |
|---|---|
| कार्यादेश (12/04/2021) प्रमाणे नेताजी सुभाषचंद्र बोस मैदान व आरक्षण क्र. 122 क सचिन तेंडूलकर मैदान कामापोटी (एप्रिल 21 ते सप्टेंबर 2021) कालावधीमध्ये अनुक्रमे रु. 78,19,659/- व रु. 36,80,306/- देयके अदा केली आहेत.<br>निविदा एस्टीमेट प्रमाणे लाल माती, शेणखत टाकणे, अकुशल व कुशल मजूर पुरवठा व मेलेले गवत/झाडे पुन्हा लावणे ह्या पाच कामांचा समावेश आहे. परंतु प्रत्यक्षात पूर्णतया पाच ॲटम नुसार कामेच झाली नाहीत हे खरे आहे काय? | खालील प्रमाणे<br>मिरा भाईंदर महानगरपलिका क्षेत्रातील उद्याने, मैदाने, स्मशाने व दुभाजके यांची निगा व देखभाल २ वर्ष कालावधीकरीता करणेकामी महाराष्ट्र शासन निर्णय क्र. मिभाम-१९२० /प्र.क्र. /४६ /नवि-२८ दि.०२/०३/२०२१ अन्वये मा. स्थायी समिती प्रकरण क्र. ३० दि.१७/०८/२०२० मधिल गोषवाऱ्यानुसार मे. निसर्ग लॅण्डस्केप सर्व्हिसेस यांची कमी दराची निविदा मंजुर केली आहे. त्यानुसार मा. आयुक्त सो. यांच्या दि.३१/०३/२०२१ रोजीच्या मंजुरीने करारनामा करुन कार्यादेश देण्यात आला आहे. त्यानुसार माहे एप्रिल २०२१ ते सप्टेंबर २०२१ ह्या कालावधीत नेताजी सुभाषचंद्र बोस मैदानाकरीता रु.७८,१९,६५९/- व प्रभाग समिती क्र. ३ मधील आरक्षण क्र. १२२क मैदानाकरीता (सचिन तेंडुलकर मैदान) रु.३६,८०,३०६/- इतकी रकमेची देयके अदा केलेली आहेत तसेच दि.१२/०४/२०२१ रोजी केलेल्या करारनाम्यातील अट क्र. २१ नुसार मिरा भाईंदर महानगरपलिका क्षेत्रातील उद्याने, मैदाने, स्मशाने व दुभाजके इत्यादी ठिकाणच्या मोजमापबद्दल काही तक्रारी आल्यास दोन्ही पक्षकाराच्या समोर (महानगरपालिका व ठेकेदार) पुनश:च सदर ठिकाणची मोजमाप घेण्यात येईल. केलेल्या मोजमापाप्रमाणे देयक कमी जास्त झाल्यास त्यानुसार संबधित पक्षकाराकडुन वसुल करण्यात येईल असे नमुद आहे. नेताजी सुभाषचंद्र बोस मैदानाचे एकुण<br>क्षेत्रफळ ६५००० चौ.मी.(म्हणजेच १६ एकर) असुन सदर मैदानावर दैनंदिन १५ ते २० मजुर व अत्याधुनिक मशीनरी मार्फत निगा व देखभालचे काम करण्यात येत आहे. प्रभाग समिती क्र. ३ मधील आरक्षण क्र. १२२क मैदान (भारतरत्न सचिन तेंडुलकर मैदान) येथील जा.क्र.मनपा/साबां/९३०६/२०१९-२० दि.२०/१२/२०१९ अनव्ये मे. राणे कन्सलटंट यांना मोजमाप करणेबाबत बांधकाम विभागाने कार्यादेश दिला होता (सोबत मा. कार्यकारी अभियंता यांचे पत्र जोडलेले आहे). त्यामध्ये आरक्षण क्र. १२२क मैदान (भारतरत्न सचिन तेंडुलकर मैदान) चे मोजमाप ४१,७४९ चो.मी. क्षेत्रफळ असे देण्यात आलेले होते. तथापि, सदर मैदानाची पाहणी केली असता सदरचे मोजमाप जास्त<br>असल्याचे निदर्शनास आलेले आहे. त्याप्रमाणे माहे ऑगस्ट – २१ पासुन सदर मैदानाचे क्षेत्रफळ कमी करुन केलेल्या कामाप्रमाणे देयक अदा करण्यात येत आहे. तसेच यापुर्वी माहे एप्रिल-२१ ते जुले-२१ पर्यंत चे आरक्षण क्र. १२२क मैदान (भारतरत्न सचिन तेंडुलकर मैदान) चे जास्तीचे देयक रु.२५,२३,८७७/- माहे ओक्टोंबर – २१ च्या देयकातुन कपात करण्यात आलेले आहे.<br>तसेच निविदा एस्टीमेंट मध्ये ५ ॲटम नुसार कामे झालेली आहेत. |
| अ) असल्यास, वस्तुस्थितीचा (प्रत्यक्षात झालेल्या कामाची) माहिती होणे आवश्यक आहे. एस्टीमेट मधील स्पेसिफिकेशननुसार ॲटम बार (बाबवार) प्रत्यक्ष झालेले काम, त्याचे मुल्यांकन, मोजणी पुस्तकामध्ये (नमुना नं. 136) नोंदविलेल्या बाबी / कामाप्रमाणे महिना निहाय (बाबवार) माहिती देण्यात यावी. | सोबत मोजणी पुस्तकाची छायांकीत प्रत जोडली आहे. |
| ब) महासभा दि. 24/12/2021 प्रश्न क्र. 37 दिलेल्या उत्तरानुसार सदर कामाची (बाबवार) मोजमापे मोजणी पुस्तकात नोंदविलेली आहेत. मोजणी पुस्तकामध्ये ॲटमप्रमाणे (एस्टीमेट) नोंद होत असते. त्यामुळे मोजणीपुस्तकांची (एप्रिल 21 ते सप्टेंबर 2021) कालावधी) प्रमाणित प्रत मिळावी अथवा मोजणी पुस्तक नोंदवहीची प्रमाणित प्रत सभागृहाच्या पटलावर सादर करावी. | उपरोक्त नमुद प्रमाणे निगा व देखभालीच्या कामाची तांत्रिक तपासणी कनिष्ठ अभियंता, प्र. उप-मुख्य उद्यान अधिक्षक व उप-आयुक्त(उद्यान) यांचेमार्फत वेळोवेळी करत असतात मोजमापानुसारच रजिस्टर / मोजमाप पुस्तिके(MB) मधील नोंदी तपासुन मुख्य लेखाधिकारी व मुख्य लेखापरीक्षक यांच्या तपासणी नंतरच मा. अतिरीक्त आयुक्त व मा. आयुक्त यांच्या मान्यतेने देयक अदा करणेत येते. |

| | |
|---|---|
| ४०. श्री. अजित भ. पाटील मा. सदस्य यांनी दि. ०३/०१/२०२२ रोजी विचारलेला प्रश्न. | |
| १) महापालिकेच्या आस्थापनेवर असलेल्या मंजूर पदानुसारच (आस्थापना सुची प्रमाणेच) वेतन देयक देण्याची तरतुद असताना देखील मंजूर पदांपेक्षा (आस्थापना सुचीपेक्षा) जादा पदांचे वेतन देयक अदा केले जातात हे खरे आहे काय? | होय. तथापी अत्यावश्यक सेवा पुरविण्यासाठी खालीलप्रमाणे सेवा पुरविल्या जातात.<br>➢ मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या विविध मालमत्तेच्या संरक्षणार्थ उद्याने, पाण्याची टाकी, स्मशानभूमी, मैदाने, महानगरपालिकेच्या शाळा, वाचनालय व अभ्यासिका यांच्या सुरक्षेसाठी सुरक्षारक्षकांची नेमणूक करण्यात आलेली आहे.<br>➢ वाहतूक पोलिसांच्या विनंतीनुसार मिरा भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्रात वाहतूक नियंत्रण करणेकामी वाहतूक शाखेच्या मदतीसाठी ट्राफिक वॉर्डन यांचा पुरवठा करण्यात येत आहे.<br>➢ महानगरपालिकेच्या विविध विभागात कामकाजात सुसुत्रता येण्याच्या दृष्टीकोनातून व कामकाज वेळेत पूर्ण होण्याच्या हेतूने संगणक चालक तथा लिपीक यांची नेमणूक करण्यात आलेली आहे.<br>➢ वैद्यकीय विभागासाठी वैद्यकीय कामकाजाकरीता बहुउद्देशीय आरोग्य कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्यात आलेली आहे.<br>उपरोक्त पदांची नेमणूक ही इतर महानगरपालिकेप्रमाणे करण्यात आलेली आहे. |
| अ) असल्यास, वस्तुस्थितीची माहिती होणे आवश्यक आहे. मंजूर पदे, (आस्थापना सुचीप्रमाणे) विभाग निहाय/पद निहाय माहिती मिळावी. अदा केलेली वेतन देयके त्यामध्ये विभाग निहाय / पद निहाय असलेली माहिती मिळावी. वेतन देयकाची (ह्यामध्ये कायम कर्मचारी/ठेक्यावर असलेली कर्मचारी/अस्थायी असलेले कर्मचारी सर्व कायम अस्थायी / ठेका वरील तात्पुरत्या / कायम कर्मचाऱ्यांचा समावेश असावा.) माहिती मिळावी. | ➢ मिरा भाईंदर महानगरपालिकेचा आकृतीबंध दि.26/02/2019 रोजी मंजूर झालेला आहे. सदर आकृतीबंधामध्ये विभाग निहाय पदे मंजूर आहे. सोबत शासन निर्णयाची प्रत जोडली आहे.<br>➢ वेतन देयकाबाबतच्या माहितीचा तक्ता सोबत जोडलेला आहे. |
| ब) महापालिकेच्या आस्थापना खर्चावर शासनाच्या मानकाप्रमाणे /निर्बंधाप्रमाणे किती टक्के पर्यंत खर्च करणेची मर्यादा आहे? प्रत्यक्षात (2020-21 वर्षात) झालेल्या खर्चाची टक्केवारी किती आहे? | ➢ महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील खर्चाची मर्यादा 35% पर्यंत आहे.<br>➢ सन 2020-21 या वर्षातील खर्चाबाबतच्या टक्केवारीचा प्रस्ताव लेखा विभागाकडून मा. महासभेपूढे प्रस्तावित करण्यात आलेला आहे. मा.महासभेची मंजूरी मिळताच आपणांस खर्चाच्या टक्केवारीची माहिती देण्यात येईल. |
| क) आस्थापनेवरील खर्च शासनाने घालून दिलेल्या निकषापेक्षा जास्त होत असल्यास, आस्थापनेवरील खर्च यापुढे वाढून देणेबाबत प्रशासनाची भुमिका काय आहे व त्यासाठी कोणत्या उपाययोजना आखल्या आहेत? | सन 2021-22 या वर्षात जवळपास 170 सुरक्षारक्षकांची कपात करुन जवळपास रु.36 लाख प्रती महिना इतकी बचत झालेली आहे. तसेच आस्थापनेवरील होणारा खर्चाबाबत आढावा घेऊन योग्य् त्या उपायायोजना करण्याची कार्यवाही प्रस्तावित आहे. |
| ४१. श्री. अनिल दि. सावंत मा. सदस्य यांनी दि. ३१/१२/२०२१ रोजी विचारलेला प्रश्न. | |
| १) शहरातील एकूण किती सार्वजनिक शौचालये आहेत ज्यांची देखभाल मनपा करते? | संबंधित विभागाकडून उत्तर प्राप्त नाही. |
| अ) सदर कामाचा ठेका मनपाने कधी, कोणाला व कितीला दिलेला आहे? | संबंधित विभागाकडून उत्तर प्राप्त नाही. |
| ब) सदर कामाच्या ठेक्यामध्ये कोणत्या कामांचा अंतर्भाव आहे? | संबंधित विभागाकडून उत्तर प्राप्त नाही. |
| क) कामामध्ये कसूर केल्या प्रकरणी सदर ठेकेदारावर कोणती कारवाई करण्यात | संबंधित विभागाकडून उत्तर प्राप्त नाही. |

<table>
<tr><td>करण्यात आली?</td><td></td><td></td></tr>
<tr><td>४२. श्री. अनिल दि. सावंत मा. सदस्य यांनी दि. ०१/०१/२०२२ रोजी विचारलेला प्रश्न.</td><td></td><td></td></tr>
<tr><td>१) शहरात एकूण किती सार्वजनिक उद्याने व बगीचा यांची मनपा देखभाल करते?</td><td></td><td>मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील एकुण ७५ उद्याने, १२ मैदाने, ११ स्मशाने व १९ दुभाजके यांची निगा व देखभाल ठेकेदारामार्फत करण्यात येते.</td></tr>
<tr><td>अ) सदर देखभाल व दुरुस्ती कामाचा ठेका मनपाने कधी, कोणाला व कितीला दिलेला आहे?</td><td></td><td>सदर उद्याने, मैदाने, स्मशाने व दुभाजके यांची २ वर्ष कालावधी करीता निगा व देखभाल करणे कामाचा ठेका मे. निसर्ग लॅण्डस्केप सर्व्हिसेस या कंपनीला जा.क्र. मनपा/ वृ.प्रा./ मिरारोड/ २०/ २०२१-२२ दि.१२/०४/२०२१ अन्वये रु.२६,३२,६३,६७३/- देण्यात आलेला आहे.</td></tr>
<tr><td>ब) सदर कामाच्या ठेक्यामध्ये कोणत्या कामांचा अंतर्भाव आहे?</td><td></td><td>सदर कामाच्या ठेक्यामध्ये मजुरा मार्फत दैनंदिन साफसफाई करणे, पाणी देणे, शोभिवंत झाडांची छाटणी / आकार देणे, लालमाती, शेणखत टाकणे, शोभिवंत झाडे खराब झाल्यास नव्याने लागवड करणे. इत्यादी कामांचा अंतर्भाव आहे.</td></tr>
<tr><td>क) कामामध्ये कसूर केल्या प्रकरणी सदर ठेकेदारावर कोणती कारवाई करण्यात आली?</td><td></td><td>निरंक</td></tr>
<tr><td>४३. श्री. अनिल दि. सावंत मा. सदस्य यांनी दि. ०१/०१/२०२२ रोजी विचारलेला प्रश्न.</td><td></td><td></td></tr>
<tr><td>१) शहरामध्ये किती गॅरेजेस आहेत त्यामध्ये अधिकृत किती व अनधिकृत किती?</td><td></td><td>
<table>
<tr><th>प्रभाग क्र.१</th><th>प्रभाग क्र.२</th><th>प्रभाग क्र.३</th><th>प्रभाग क्र.४</th><th>प्रभाग क्र.५</th><th>प्रभाग क्र.६</th><th>एकुण</th></tr>
<tr><td>पक्या इमारतीतील - ०५,</td><td>पक्या इमारतीतील - २५,</td><td>पक्या इमारतीतील - ३५,</td><td>पक्या इमारतीतील - ४५,</td><td>पक्या इमारतीतील - १९,</td><td>पक्या इमारतीतील - ३२,</td><td>१६१</td></tr>
<tr><td>मोकळ्या जागेतील- ००</td><td>मोकळ्या जागेतील- ००</td><td>मोकळ्या जागेतील- ००</td><td>मोकळ्या जागेतील- ३३</td><td>मोकळ्या जागेतील- ०२</td><td>मोकळ्या जागेतील- ५६</td><td>९१</td></tr>
</table>
</td></tr>
<tr><td>अ) शहरामध्ये किती कार वॉशिंग सेंटर आहेत त्यामध्ये अधिकृत किती व अनधिकृत किती?</td><td></td><td>
<table>
<tr><th>प्रभाग क्र.१</th><th>प्रभाग क्र.२</th><th>प्रभाग क्र.३</th><th>प्रभाग क्र.४</th><th>प्रभाग क्र.५</th><th>प्रभाग क्र.६</th><th>एकुण</th></tr>
<tr><td>पक्या इमारतीतील - ०२,</td><td>पक्या इमारतीतील - ०३,</td><td>पक्या इमारतीतील - ०३,</td><td>पक्या इमारतीतील - ०३,</td><td>पक्या इमारतीतील - ०१,</td><td>पक्या इमारतीतील - ०२,</td><td>१४</td></tr>
<tr><td>मोकळ्या जागेतील- ००</td><td>मोकळ्या जागेतील- ००</td><td>मोकळ्या जागेतील- ००</td><td>मोकळ्या जागेतील- १३</td><td>मोकळ्या जागेतील- ०१</td><td>मोकळ्या जागेतील- ०४</td><td>१८</td></tr>
</table>
</td></tr>
<tr><td>ब) शहरामध्ये किती सर्विस सेंटर आहेत त्यामध्ये अधिकृत किती व अनधिकृत किती?</td><td></td><td>
<table>
<tr><th>प्रभाग क्र.१</th><th>प्रभाग क्र.२</th><th>प्रभाग क्र.३</th><th>प्रभाग क्र.४</th><th>प्रभाग क्र.५</th><th>प्रभाग क्र.६</th><th>एकुण</th></tr>
<tr><td>पक्या इमारतीतील - ०२,</td><td>पक्या इमारतीतील - ०१,</td><td>पक्या इमारतीतील - १७,</td><td>पक्या इमारतीतील - ०५,</td><td>पक्या इमारतीतील - ००,</td><td>पक्या इमारतीतील - ०२,</td><td>२७</td></tr>
</table>
</td></tr>
</table>

| | प्रभाग क्र.१ | प्रभाग क्र.२ | प्रभाग क्र.३ | प्रभाग क्र.४ | प्रभाग क्र.५ | प्रभाग क्र.६ | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | मोकळ्या जागेतील- ०० | मोकळ्या जागेतील- ०० | मोकळ्या जागेतील- ०० | मोकळ्या जागेतील- ०० | मोकळ्या जागेतील- ०० | मोकळ्या जागेतील- ०० | ०० |
| क) शहरामध्ये किती वाहन शोरुम आहेत त्यामध्ये अधिकृत किती व अनधिकृत किती? | प्रभाग क्र.१ | प्रभाग क्र.२ | प्रभाग क्र.३ | प्रभाग क्र.४ | प्रभाग क्र.५ | प्रभाग क्र.६ | एकुण |
| | पक्या इमारतीतील - ०२, | पक्या इमारतीतील - ०१, | पक्या इमारतीतील - ०६ | पक्या इमारतीतील - १० | पक्या इमारतीतील - ०१, | पक्या इमारतीतील - ०२ | २२ |
| | मोकळ्या जागेतील- ०० | मोकळ्या जागेतील- ०० | मोकळ्या जागेतील- ०० | मोकळ्या जागेतील- ०० | मोकळ्या जागेतील- ०० | मोकळ्या जागेतील- ०० | ०० |
| ड) वरील पैकी किती जनांनी मनपाचा परवाना घेतलेला आहे? | प्रभाग क्र.१ | प्रभाग क्र.२ | प्रभाग क्र.३ | प्रभाग क्र.४ | प्रभाग क्र.५ | प्रभाग क्र.६ | एकुण |
| | ११ | २५ | १६ | ५२ | १५ | ३७ | १५६ |
| इ) वरील व्यवसायासाठी प्रती परवाना 10,000.00 प्रमाणे किती परवाना फी मनपाकडे जमा झालेली आहे? | प्रभाग क्र.१ | प्रभाग क्र.२ | प्रभाग क्र.३ | प्रभाग क्र.४ | प्रभाग क्र.५ | प्रभाग क्र.६ | एकुण |
| | रु.१,७०,०००/- | रु.२,५०,०००/- | रु.१,६०,०००/- | रु.५,८०,०००/- | रु.१,५०,०००/- | रु.१,६०,०००/- | रु.१४,७०,०००/- |
| ई) किती व्यवसाय मनपा आरक्षण जागेत आहेत? | प्रभाग क्र.१ | प्रभाग क्र.२ | प्रभाग क्र.३ | प्रभाग क्र.४ | प्रभाग क्र.५ | प्रभाग क्र.६ | एकुण |
| | निरंक | निरंक | निरंक | ०७ गॅरेज | निरंक | निरंक | ०७ गॅरेज |
| उ) किती व कोणत्या प्रभाग अधिकाऱ्यांनी कोणत्या तात्पुरत्या स्वरुपात परवानगी दि. | प्रभाग क्र.१ | प्रभाग क्र.२ | प्रभाग क्र.३ | प्रभाग क्र.४ | प्रभाग क्र.५ | प्रभाग क्र.६ | एकुण |
| | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक |
| ऊ) 15 दिवसात परवानगी न घेतलल्या कोणत्या आस्थापनांवर फौजदारी गुन्हा दाखल केलेला आहे? | प्रभाग क्र.१ | प्रभाग क्र.२ | प्रभाग क्र.३ | प्रभाग क्र.४ | प्रभाग क्र.५ | प्रभाग क्र.६ | एकुण |
| | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक |
| ए) सदर व्यवसाय करणाऱ्यांनी मनपाने रस्ते, पदपथ व इतर मोकळ्या जागेत वाहने उभी करुन मनपाला किती दंडाची रक्कम जमा केली? | प्रभाग क्र.१ | प्रभाग क्र.२ | प्रभाग क्र.३ | प्रभाग क्र.४ | प्रभाग क्र.५ | प्रभाग क्र.६ | एकुण |
| | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक |
| ऐ) प्रशासनाने सदर ठरावाची अंमलबजावणी केलेला सविस्तर अहवाल काय आहे? | वरील नमूद आस्थापनांकडे परवाना घेतलेला नसेल अशा आस्थापनांचे वाहन दुरुस्ती व इतर साहित्य जप्त करण्याची कारवाई वेळोवेळी करण्यात येत असते. तसेच अनधिकृत आस्थापनावर निष्कासनाची कारवाई प्रशासना मार्फत करण्यात येते. | | | | | | |

(विजयकुमार म्हसाळ)
अति. आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

| अ.क्र | ठेकेदराचे नाव | ठेका पध्दतीने पुरवठा कर्मचारी संख्या | एकुण खर्च |
|---|---|---|---|
| 1. | मे.सैनिक इंटेलिजन्स अॅण्ड प्रा.लि | सुरक्षा रक्षक 694 | रु.18,22,66,608/- इतका अंदाजित वार्षिक खर्च आहे. |
| 2. | महाराष्ट्र स्टेट सिक्युरिटी कॉर्पोरेशन | सुरक्षा रक्षक 246 | रु.7,09,56,000/- इतका अंदाजित वार्षिक खर्च आहे. |
| 3. | मे. देवमामलेदार स्वयं रोजगार सेवा सहकारी संस्था मर्यादित | कनिष्ठ अभियंता 35 | रु.1,09,77,960/- इतका वार्षिक अंदाजित खर्च आहे. |
| 4. | मे.गणेश कृपा ट्रान्सपोर्ट | संगणक चालक तथा लिपीक 105 | 1. 89 कर्मचारी प्रमाणे रु.2,37,40,575/-<br>2. 105 कर्मचारी प्रमाणे रु.2,80,08,540/- |
| 5. | मे. अल्फा गार्डस सर्व्हीसेस प्रा.लि. | ट्राफिक वार्डन 50 | रु.1,65,54,000/- इतका वार्षिक अंदाजित खर्च आहे. |

सहाय्यक आयुक्त
मिरा-भाईंदर महानगरपालिका